आर.सी.सी. क्र. १४३/२०२६
सरकार वि. अजय
निशाणी क्र. २१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
**मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नाव | – बलवीर पारसनाथ बसवंते, |
| वय | – ३८ वर्ष |
| धंदा | – मजुरी, |
| राहणार | – हरी नगर, पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी. |

**सरतपास सरकार तर्फे श्रीमती. व्ही. के. नरवाडे, सहायक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत**

१. घटना अंदाजे एक वर्षापूर्वी सायंकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास माझ्या घरासमोर हरी नगर येथे घडली. घटनेचा दिनांक मला आठवत नाही. सदर दिवशी माझा व अजय कांबळे याच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता. सदर वादा व्यतिरिक्त सदर दिवशी इतर काहीही घडले नव्हते. प्रस्तुत वादामुळे मी पोलीस स्टेशन पूर्णा तक्रार दाखल केली होती. आता मला दिनांक ०५.०८.२०२४ रोजीची तक्रार दाखवली, त्यातील मजकूराबाबत मला काहीही माहिती नाही, सदर तक्रारीवर माझी सही असून ती मी ओळखतो, साक्षीदाराने तक्रारीवरील सही ओळखल्यामुळे सहीस **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

***साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.***

२. दिनांक ०४.०८.२०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास कचरा टाकण्याच्या कारणावरुन माझ्यामध्ये व आरोपीमध्ये वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादा दरम्यान आरोपी माझ्या पत्नीच्या अंगावर धावून गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी आरोपींना समजावण्याचा प्रयत्न करत असता आरोपी अजय याने माझ्या उाव्या हातावर, पाठीवर व उजव्या हातावर लाकडाने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपीने मला जिवे

मारण्याची धमकी दिली. आता मला माझ्या तक्रारीतील मजकूर अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखवला, तो माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी नमूद केला नाही, तसेच सदर मजकूर पोलीसांनी माझ्या तक्रारीमध्ये का नमूद याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये आपापसात तडजोड झाली असून त्या अशयाची पुरसीस मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होउ नये म्हणून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उत्तर सूचक प्रश्न संपले

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. मुथा यांच्या मार्फत**

नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(एस. एस. साळुंखे)

दिनांक – १५.०६.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

पूर्णा.